जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४२२ दिनांक - ०७/१०/२०२४**

युनिट-३ गुन्हे शाखा पुणे शहर

## खंडणीच्या गुन्हयातील ०१ वर्षापासून फरारी आरोपी जेरबंद

दि.०६/०५/२०२३ रोजी फिर्यादी यांना खंडणी उकळण्याचे उददेशाने त्यांची गाडी अडवून फिर्यादी यांना गाडीतुन खाली उतरवून चाकुचा धाक दाखवून शिवीगाळ व मारहाण करून ५०,००,०००/- रूपये खंडणी मागतलेबाबत भारती विदयापीठ पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर २९७/२०२३ भादंविक ३८७, ५०६ (२), ३२३, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ प्रमाणे दि. १४/०५/२०२३ रोजी गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाचे तपासात तेजस मधुकर कांबळे, वय २३ वर्षे, रा. पवन मेडीकल शेजारी, बेनकरी वस्ती, धायरी, पुणे हा आरोपी गुन्हा केलेपासून फरार होता. सदर आरोपीबाबत गुन्हे शाखा, युनिट ३, पुणे कडील पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर चित्ते यांना मिळाले बातमी वरून नमुद आरोपीस धायरी फाटा, पुणे येथून पकडून त्यास पुढिल कारवाईकामी भारती विदयापीठ पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री शैलेश बलकवडे, पुणे शहर मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.निखील पिंगळे, मा.सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. गणेश इंगळे, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे प्रभारी अधिकारी,वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंगराव पवार, पोलीस अंमलदार विनोद भंडलकर, गणेश सुतार, विनोद जाधव, सोनम नेवसे, ज्ञानेश्वर चित्ते, गणेश शिंदे यांचे पथकाने केली आहे.

